महाराष्ट्र शासन

अत्यंत तातडीचे

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १४ मार्च २०२०

प्रति,

अपर मुख्य सचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, उच्च व तंत्रशिक्षण
मंत्रालय, मुंबई

आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण, पुणे
संचालक, शालेय शिक्षण, पुणे / उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई

**विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..**

शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहे.

करोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तथापि, या सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील १० व १२ च्या परिक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या परिक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्या असाही निर्णय घेण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधीत संस्था प्रमुखास देण्यात याव्यात.

तरी उपरोक्तनुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत प्रधान सचिव (नगरविकास - २) मंत्रालय, मुंबई
प्रत आयुक्त, महानगरपालिका, (सर्व)

पंचायत समिती, शिक्षण, अलिबाग.
दिनांक:१४/३/२०२०

प्रति,
मा.प्राचार्य,
कनिष्ठ महाविद्यालय
..............
मुख्याध्यापक
..............
ता.अलिबाग.

विषय:- राज्यात करोना व्हायरसचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारी म्हणून राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये यांना दि. ३१ मार्च २०२० पर्यंत सुट्टी जाहीर करणे बाबत. .

संदर्भ:- मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), रा.जि.प.अलिबाग यांचे पत्र दि.१४/३/२०२०

वरील विषयान्वये कळविण्यात येते की, करोना व्हायरसचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारी म्हणून राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये यांना शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यांत आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनूसार सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने दि.३१ मार्च २०२० पर्यंत सुटी जाहिर करणेंत आली आहे.

तसेच सर्व नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील इ.१०वी व १२वी च्या परिक्षा विहित वेळापत्रकानूसार सुरु राहतील. त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याची आहे.

वरील प्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्याची आहे.

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती,अलिबाग.

प्रत:- मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांजकडे माहितीस्तव सादर.
प्रत:- मा.गट विकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती, अलिबाग यांजकडे माहितीस्तव सादर.

Head Master,
I. E. S. Secondary School
Versoli, Alibag, Raigad